# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## शुक्रवार, दिनांक २१ मार्च,२०२५

## (सकाळी १०.०० ते ११.४५ वाजता)

(क) **(मंगळवार, दिनांक ११ मार्च, २०२५, बुधवार, दिनांक १२ मार्च, २०२५, सोमवार, दिनांक १७ मार्च, २०२५, मंगळवार, दिनांक १८ मार्च, २०२५, बुधवार, १९ मार्च, २०२५ व गुरुवार, दिनांक २० मार्च, २०२५ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) - (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर) —**

**सर्वश्री प्रविण दरेकर,** हेमंत पाटील, विक्रम काळे, प्रसाद लाड, डॉ.मनिषा कायंदे, श्री.सतिश चव्हाण, श्रीमती चित्रा वाघ, श्रीमती भावना गवळी, सर्वश्री कृपाल तुमाने, श्रीकांत भारतीय, अमोल मिटकरी, किशोर दराडे, निरंजन डावखरे, किरण सरनाईक, पंकज भुजबळ, राजहंस सिंह, शिवाजीराव गर्जे, योगेश टिळेकर, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री ज्ञानेश्वर म्हात्रे, विक्रांत पाटील, सदाशिव खोत, अमित गोरखे, वसंत खंडेलवाल, डॉ.परिणय फुके, सर्वश्री अमरीशभाई पटेल, धर्मगुरु बाबुसिंग राठोड, रणजितसिंह मोहिते-पाटील, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"हे राज्य लोकांचे आहे आणि लोकांसाठी आहे" ही भावना मनामध्ये ठेवून महायुतीचे शासन वेगाने कार्यरत असणे, मुंबई-पुणे व एमएमआरडीएसह राज्यातील अन्य छोट्या शहरांमध्ये स्टार्टअपची संख्या वाढत असल्याने इंडिया स्टार्टअपनी घोषित केलेल्या आकडेवारीनुसार महाराष्ट्र हे स्टार्टअपचे देशातील पहिल्या क्रमाकांचे राज्य ठरले असणे, महायुती शासनाने महाराष्ट्रात अशक्य वाटणारा समृध्दी महामार्ग कार्यान्वित केला असणे, या महामार्गामुळे मुंबई-पुण्यात होणारी गुंतवणूक धुळे, गडचिरोली, नागपूर, अमरावती या भागात वाढत असल्याचे निदर्शनास येणे, नागपूर-गोवा शक्तीपीठ द्रुतगती मार्गाचे बांधकाम हाती घेण्याचा निर्णय घेतला असणे, या द्रुतगती मार्गामुळे, त्या मार्गावरील प्रमुख धार्मिक क्षेत्रे व तिर्थस्थळे जोडण्याचे प्रयोजन असून या प्रदेशातील आर्थिक विकासाला देखील चालना मिळू शकेल, राज्याच्या शहरी भागात पायाभुत सुविधांद्वारे शहरी जीवनमान सुधारण्यासाठी 'नगरोत्थान महाभियान' प्रभावीपणे राबविण्याचे प्रयोजन असणे, या योजनेंतर्गत पाणी पुरवठा, मलःनिस्सारण व विकास यांचे सुरु असलेले प्रकल्प दोन वर्षांत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असणे, मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असल्याने या शहरामध्ये गृहनिर्माण व गतीमान परिवहन हे मुद्दे प्राधान्याने विचारात घेऊन स्मार्ट सिटीच्या माध्यमातून स्थानिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासनाचा प्रयत्न असणे, मेट्रो-२ ए आणि २ बी ची

सेवा सुरु झाल्याने पश्चिम द्रुतगती मार्गावरील अंधेरी आणि दहिसरच्या मध्ये वाहतुक कोंडी कमी होऊन मुंबईकरांचे प्रवास सुखकर झाल्याचे दिसून येणे, ठाणे-बोरीवली भुयारी मार्गाची निर्मिती करण्याचे धोरण प्रस्तावित असणे, मुंबई-पुणे मिसिंग लिंक या ६७०० कोटी रुपयांच्या प्रकल्पाचे काम सुरु असणे, वर्सोवा-वांद्रे सागरी सेतुची निर्मिती, शिवडी ते न्हावाशेवा या मुंबई पारबंदर प्रकल्पाची निर्मिती जलदगतीने सुरु असणे, मुंबईतील कुर्ला येथील नेहरूनगर, टिळकनगर या म्हाडा वसाहतीतील अनेक इमारतींचा पुनर्विकास होऊन १० ते १५ वर्षे उलटल्यानंतरही त्यांना भोगवटा प्रमाणपत्र मिळाली नसल्याचे निदर्शनास येणे, या गृहनिर्माण वसाहतींसाठी लागू केलेल्या अभय योजनेची मुदत वाढविण्याची आवश्यकता, कुर्ला येथील रेल्वे हद्दीतील संतोषी माता नगर, साबळे नगर व क्रांतीनगर येथे अनेक वर्षे राहणाऱ्या झोपडीधारकांना रेल्वे प्रशासनामार्फत पर्यायी जागा उपलब्ध करण्याकरिता राज्य शासनाने प्रयत्न करण्याची आवश्यकता, नेहरूनगर येथील म्हाडाच्या वसाहतीत राहणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांना माफक दरात निवासस्थाने उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, राज्यभरात ४०९ नागरी समुहांमध्ये 'प्रधानमंत्री आवास योजना (शहरी)' राबविण्याचे प्रयोजन असणे, या योजनेंतर्गत २ लाखांपेक्षा अधिक घरे बांधण्यात आली असून, १ लाख ८५ हजारांपेक्षा अधिक घरांचे बांधकाम प्रगतीपथावर असणे, मेट्रो तसेच कोस्टल रोड प्रकल्प पूर्ण झाल्याने मुंबईकरांचे जीवनमान उंचावणे, मुंबईतील कोळीवाडा आणि गावठाणाकरिता सीमांकन करून वेगळी विकास नियंत्रण नियमावली तातडीने तयार करण्याची आवश्यकता, कोळीवाडे व गावठाणांची झालेली दुरावस्था तातडीने दूर करण्याची आवश्यकता, पुण्यातील सहकारी गृहनिर्माण संस्था व वसाहतींचे स्ट्रक्चरल ऑडीट करुन पुनर्विकास करण्याची आवश्यकता, पुणे शहरात विमानतळाकरिता जागा राखीव असून अन्य पायाभुत सुविधा तातडीने करण्याची आवश्यकता, पुण्यातील जुन्या ब्रिटीशकालीन वाड्यांचा पुनर्विकास करण्याची आवश्यकता, जुन्या चाळींची व्याख्या बदलून हेरिटेज टिडीआर प्रत्यक्ष अंमलात आला असणे, एमएमआरडीए क्षेत्रात सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या पुनर्विकासासाठी मुंबई जिल्हा बँकेला नोडल एजन्सी म्हणून मान्यता देण्यात येणे, मुंबईतील जुन्या इमारतींच्या स्वयंपुनर्विकासाकरिता मुंबई जिल्हा बँकेकडून देण्यात येणाऱ्या कर्ज मर्यादेत वाढ करण्यात आली असल्याने गृहनिर्माण प्रकल्प वेगाने उभे रहात असल्याचे निदर्शनास येणे, मानीव अभिहस्तांतरण करण्यासाठी स्टॅम्प डयुटी भरण्यात सुलभता होण्यासाठी मुद्रांक शुल्क अभय योजना सुरु करण्यात येणे, झोपडपट्टी पुनर्वसन मधील सदनिका हस्तांतरण शुल्कात ५० टक्के कपात करण्याचा निर्णय घेण्यात येणे, राज्यात ५१ लाख घरे बांधण्याचे प्रस्तावित असणे, ठाणे शहरात एमआयडीसीच्या अभिन्यासातील १५०० हेक्टर भूखंडावर जगातील सर्वात मोठा क्लस्टर प्रकल्प राबविण्यात येणे, समूह विकास पध्दतीने हा प्रकल्प राबविण्याचे प्रयोजन असणे, वाशी येथील सध्याच्या दोन खाडी पुलांना समांतर अशा तिसऱ्या सहा पदरी

असुधारित प्रत

खाडी पुलाच्या प्रकल्पाचे काम सुरु असणे, नवी मुंबई विमानतळामुळे वाढणाऱ्या लोकसंख्येसाठी नियोजित 'नैना' प्राधिकरणामार्फत २३ गावांच्या नियोजित आराखडयाच्या अंमलबजावणीस गती देण्याची आवश्यकता, मुंबई, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर यांसारख्या मोठ्या शहराचा मेगापॉलिस मेटाव्हर्स प्रकल्पाच्या मदतीने अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन जागतिक पटलावरचे हे महानगर त्याच उच्च दर्जाचे व्हावे व येथील प्रत्येक कुटुंबात सुख आणि समाधान नांदावे ही या शासनाची महत्वाकांक्षा असणे, मुंबई व एमएमआरडीए क्षेत्रातील घरांची समस्या, वाहतुक समस्या इ. चे गतीमानतेने निर्मूलन करून मुंबईचा पर्यावरणपूरक विकास करण्याच्या दृष्टीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**(ख) (सोमवार, दिनांक १७ मार्च, २०२५, मंगळवार, दिनांक १८ मार्च, २०२५, बुधवार, दिनांक १९ मार्च, २०२५ व गुरुवार, दिनांक २० मार्च, २०२५ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) — (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर) —**

**सर्वश्री अंबादास दानवे,** सतेज ऊर्फ बंटी पाटील, एकनाथराव खडसे, ॲड.अनिल परब, सर्वश्री अभिजीत वंजारी, शशिकांत शिंदे, सचिन अहिर, अशोक ऊर्फ भाई जगताप, सुनिल शिंदे, जयंत आसगावकर, जगन्नाथ अभ्यंकर, डॉ.प्रज्ञा सातव, सर्वश्री धीरज लिंगाडे, राजेश राठोड, सुधाकर अडबाले, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"शासनाच्या दिशाहीन धोरणांमुळे शहर आणि ग्रामीण भागातील महत्त्वाची विकासकामे रखडली असून, विविध योजनांमध्ये मोठ्या प्रमाणात अपारदर्शकता आणि आर्थिक गैरव्यवहार झालेले असणे, राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूका रखडल्यामुळे अनेक विकासकामे प्रलंबित असून प्रशासकीय अधिकाऱ्यांचा अनेक कामांमध्ये वाढलेला हस्तक्षेप, विरोधी पक्षांच्या लोकप्रतिनिधिंना निधी देताना मिळत असलेला दुजाभाव, राज्यातील स्मार्ट सिटी योजनांचा वेग अत्यंत संथ असून निधी मंजुरीस विलंब होत असणे, अनेक प्रकल्प कागदावरच राहिले असणे, महानगरपालिका आणि नगरपालिका स्तरावर कचरा व्यवस्थापनासाठी मोठ्या प्रमाणात निधी मंजूर केला जातो, पण प्रत्यक्षात त्याचा योग्य वापर न करता भ्रष्टाचार केला जात असणे, अनेक शहरांमध्ये रस्ते खोदकाम सुरूच असणे, पण दर्जेदार पायाभूत सुविधा निर्माण होत नसणे, ड्रेनेज लाईनसाठी मंजूर केलेले प्रकल्प अपूर्ण असणे, परिणामी शहरांमध्ये पावसाळ्यात पाणी साचण्याचे प्रमाण वाढले असणे, स्मार्ट सिटी अंतर्गत मंजूर रस्ते व पूल अपूर्ण असल्यामुळे अनेक ठिकाणी पूल आणि उड्डाणपूल (फ्लायओव्हर) वर्षानुवर्षे अपूर्ण असून त्यामुळे होत असलेली वाहतूक कोंडी, प्रधानमंत्री आवास योजना (PMAY) आणि राज्य सरकारच्या घरकुल योजनांचे

अग्रिम प्रत

अनुदान लाभार्थ्यांना वेळेवर मिळत नसणे, घरकुल प्रकल्प रखडले असून अनेक कंत्राटदारांनी कामच बंद केले असणे, म्हाडा आणि सिडकोच्या घरवाटप प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात अपारदर्शकता असून, सामान्य नागरिकांना परवडणाऱ्या घरांसाठी प्रचंड अडचणी येणे, मोठ्या विकासकांना फायदा मिळवून देण्यासाठी नियमांचे उल्लंघन होत असणे, अनेक झोपडपट्ट्या व जुन्या चाळी तसेच सोसायट्यांचे पुर्नविकास प्रकल्प फसव्या विकासकांमुळे रखडले असणे, रहिवाशांना तात्पुरत्या जागांमध्ये हलवून त्यांना पुन्हा घर मिळत नसणे, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना आणि राज्यस्तरीय रस्ते योजना रखडल्या असणे, अनेक गावांना जोडणारे रस्ते अजूनही खराब अवस्थेत असून मंजूर निधीचा उपयोग होत नसणे अनेक गावांमध्ये अद्याप पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नसणे, टँकर माफियांना फायदा होईल, यासाठी पाणीपुरवठा योजना रखडवल्या जात असणे, गाव तिथे रस्ता ही संकल्पना पुर्णत्वास आली नसल्याने अनेक गावांपर्यंत अद्यापही पक्के रस्ते पोहोचलेले नसणे, पाणंद रस्ते निधी अभावी प्रलंबित असल्याने शेतकऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागणे, परिवहन विभाग व अखात्यारित असलेले महामंडळे यामध्ये सुरु असलेली अनियमितता व गैरव्यवहार, या सर्व प्रश्नांकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक : नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी**

**दोन : नवनिर्वाचित सदस्यांचा परिचय**

**तीन : प्रश्नोत्तरे**

**चार : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे —**

**(१) मुख्यमंत्री : (क)** "महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल आणि सन २०२२-२०२३ या वर्षाचा भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा अलग लेखापरीक्षा अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** "महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा एकोणीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(२) दुग्धविकास मंत्री** : "महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्यादित, मुंबई (महानंद दुग्धशाळा) यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा वैधानिक लेखा परिक्षण अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(३) ग्रामविकास व पंचायत राज मंत्री** : **(क)** "सन २०२०-२०२१ चा महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यावरील पन्नासावा लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** "सन २०२१-२२ व २०२२-२३ चे ठाणे/ रायगड/ रत्नागिरी/ सिंधुदुर्ग/ पालघर/ नाशिक/ धुळे/ नंदुरबार/ जळगांव/ अहिल्यानगर/ पुणे/ सातारा/ सांगली/ सोलापूर/ कोल्हापूर/ संभाजीनगर/ जालना/ परभणी/ हिंगोली/ बीड/ नांदेड/ धाराशीव/ लातूर/ अमरावती/ अकोला/ वाशिम/ बुलढाणा/ यवतमाळ/ नागपूर/ वर्धा/ भंडारा/ गोंदिया/ चंद्रपूर व गडचिरोली या ३४ जिल्हा परिषदांचे वार्षिक प्रशासन अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**पाच : लक्षवेधी सूचना (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

**(गुरुवार, दिनांक २० मार्च, २०२५ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (१) ते (८)] —**

(१) **श्री.शशिकांत शिंदे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"कोरेगांव तालुक्यातील (जि.सातारा) कोरेगांव नगरपंचायती अंतर्गत सुरु असलेल्या विकास कामामध्ये मोठ्या प्रमाणात लाखो रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे नुकतेच माहे मार्च, २०२५ मध्ये उघडकीस येणे, सदर नगरपंचायतीअंतर्गत शांतीनगर येथे गटार बांधकाम, आझाद नगर चौक ते बनसोडे घर गटार बांधकाम करणे आदि कामांचा समावेश असणे, सदर कामे

पूर्वीच केलेली असतांना नव्याने केली असल्याचे दाखवून कामाचा प्रस्ताव व अंदाजपत्रक तयार करुन देयके तयार करणे, स्वच्छ सर्वेक्षण सन २०१९-२० व सन २०२०-२१ या योजनेअंतर्गत रंगरंगोटी केलेल्या एकाच कामाचे देयक दोनदा काढून केलेला भ्रष्टाचार, सदर कामाकरिता नेमलेल्या कर्मचाऱ्यांच्या संख्येत असलेली तफावत, सदर कामाकरिता वर्ग करण्यात आलेला निधी इतर विकास कामांना वापरल्याचेही समोर येणे, शहरातील कचरा गोळा करण्याकरिता नेमलेल्या ठेकेदारांनी कचरा घंटागाड्यामार्फत गोळा करुन निवारा शेडमध्ये जमा करणे, असे असतांनाही ठेकेदारांची देयके अदा करण्यात येणे, सदर गैरव्यवहार व भ्रष्टाचाराबाबत जिल्हाधिकारी, सातारा यांच्याकडे तक्रारी करुनही कोणतीच ठोस कारवाई न होणे, दोषींना अभय देण्याचा होत असलेला प्रयत्न, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने सखोल चौकशी करुन यात दोषी असणाऱ्या मुख्याधिकारी, ठेकेदार, संबंधित अधिकारी यांच्यावर कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. "

(२) **श्री.अमित गोरखे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माहिती तंत्रज्ञान विभागात सन २००८ पासून ते सन २०२५ पर्यंत प्रोबीटी/टेक ९ सर्व्हिसेस कंपनी सॉफ्टवेअर व देखभालीचे काम पाहत असणे, सदरची कंपनी जुनी असून महानगरपालिकेच्या कामाचा अनुभव खूप जास्त असणे, प्रोबीटी/टेक ९सर्व्हिसेसचा विकसनशील आणि देखभालीचा खर्च ५वर्षांकरिता अंदाजे १० कोटी येणे, जुनी कंपनीला एवढा कामाचा अनुभव व कमी खर्चात काम होत असताना ११२ कोटी चे GISERP ची वेगळी निविदा काढण्यात येणे, तसेच निविदा धारक ATOS india pvt ltd & Nascent info tech pvt ltd कंपनीला काम मिळून ४ वर्षाचा कालावधी उलटला असून सुद्धा काम अत्यंत संथगतीने सुरु असल्याचे निदर्शनास येणे, प्रोबीटी/टेक ९सर्व्हिसेस कंपनी या जुन्या कंपनीकडे महानगरपालिकेचा अत्यंत संवेदनशील डेटा असणे, त्यांची निविदा संपल्यानंतर ATOS india pvt ltd & Nascent info tech pvt ltd कंपनीला महानगरपालीकेची कोणतीही गोपनीय माहिती प्रसारित होणार नाही याची खबरदारी घेतली आहे का ? तसेच नवीन ATOS india pvt ltd & Nascent info tech pvt ltd हि कंपनी गोपनीयतेच्या दृष्टिकोनातून काळजी

असुधारित प्रत

घेईल का ? किंवा याची जबाबदारी अधिकारी घेतील का ? असे प्रश्न उपस्थित होणे,सदर प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची आवश्यकता, सदर कामावर स्थगिती आणून संबंधित दोषी अधिकाऱ्यांना निलंबित करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

**(३)** **श्री.सत्यजीत तांबे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मौजे केसनंद ता. हवेली, जि. पुणे येथील गट नं. १०१, १०२-(जुना स.नं. १६४ व १६५) या सुमारे ६५ एकर जमिनीबाबत सन १९१२ चे क.ड.ई. पत्र पाहता कब्जेदार सदरी श्री. गंगाराम लाडू माळी यांचे वारस म्हणून श्री. महादू गंगाराम माळी यांचे नाव दाखल असणे, तथापि सन १९३०- ३१ साली ७/१२ तयार होताना इतर व्यक्तींची नावे कोणत्याही फेरफाराने, दस्तऐवजाशिवाय तसेच सक्षम प्राधिकाऱ्याच्या संमती शिवाय दाखल झालेले असणे, याप्रकरणी तहसिलदार हवेली, पुणे यांनी शासनास सादर केलेल्या अहवालात मूळ मालकाच्या संमती शिवाय इतर व्यक्ती यांचे नावे कसे दाखल झाली त्याचा अभिलेखातील उपलब्ध कागदपत्रे पाहता बोध होत नाही असे स्पष्ट मत नोंदविलेले असणे, त्यामुळे याप्रकरणी प्रथम दर्शनी अनियमित्ता होऊन भ्रष्टाचार झाल्याचे निष्पन्न होणे, परिणामी मूळ खातेदारांच्या वारसांवर घोर अन्याय झाल्याने त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण होणे, यावरील अतिक्रमण काढण्याबाबत PMRDA ने आदेश देऊनही अतिक्रमण निष्कासित न होणे, चुकीचे तुकडेबंदी झालेल्या खरेदीखते करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करून नोंद रद्द घेणे, याप्रकरणी चौकशी करून दोषींवर कारवाई करून मूळ जमिन मालक व त्यांच्या वारसदारांना न्याय देण्याची नितांत आवश्यकता, याप्रकरणी शासनाने करावायाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(४)** **सर्वश्री अभिजित वंजारी**, सतेज ऊर्फ बंटी पाटील, अशोक ऊर्फ भाई जगताप, राजेश राठोड, जयंत आसगावकर, डॉ. प्रज्ञा सातव, सर्वश्री धीरज लिंगाडे, सुधाकर अडबाले, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे, **उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील १२५०० पेक्षा अधिक सार्वजनिक ग्रंथालय सुरू असून गेल्या अनेक वर्षात त्यांना मिळणाऱ्या अनुदानात वाढ न झाल्यामुळे सर्व सार्वजनिक ग्रंथालयाच्या भवितव्याचा प्रश्नचिन्ह निर्माण होणे, 'अ' वर्गातील ग्रंथालयांना

रू.७.२० लाख अनुदान, तर ‘ब’ वर्गातील ग्रंथालयांना रू.३.६० लाख, ‘क’ वर्गातील ग्रंथालयांना रू.१.५३ लाख, ‘ड’ वर्गातील ग्रंथालयांना रू.४८.०० हजार, वार्षिक अनुदान मिळत असणे, या अनुदानामध्ये तिथे काम करणारे कर्मचा-यांचे वेतन, पुस्तके खरेदी व वर्तमानपत्र, मासिके व फर्निचर खरेदी इत्यादी खर्च अत्यल्प अनुदानातून करावा लागणे,ग्रामीण भागातील स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना या सार्वजनिक ग्रंथालय मोठ्या प्रमाणात उपयोग असूनसुध्दा या चळवळीकडे शासनाचे दुर्लक्ष होणे, तसेच गेल्या अनेक वर्षापासून राज्याची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढलेली असून त्या तुलनेमध्ये आजही या सार्वजनिक ग्रंथालयाची संख्या अपूरी पडत असणे गेल्या अनेकवर्षापासून एकही नवीन सार्वजनिक ग्रंथालयाला शासनाने परवानगी दिलेली नसल्यामुळे या चळवळीला अडचण निर्माण झाली असणे, शासनाच्या वित्त व नियोजन विभागाच्या वेगवेगळ्या विकासाच्या योजनेमध्ये उदा. नाविण्यपूर्ण योजना अथवा ग्रामीण विकास योजना यामध्ये शासकीय ग्रंथालयांना कुठल्याही प्रकारची आर्थिक मदत मिळत नसणे, तसेच जिल्हा नियोजन समितीच्या निधी वितरणामध्ये जिल्हा प्रशासनाची सार्वजनिक ग्रंथालयाच्या प्रति उदासिनता असल्यामुळे दिवसेंदिवस ही चळवळ खुंटत चालली असल्याने याबाबत राज्य शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता."

(५) **श्री.हेमंत पाटील, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे, **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"कोरोना काळात म्हणजेच सन २०२० आणि सन २०२१ अशा दोन विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी शासकीय शाळांनी विशेष प्रयत्न केलेले असणे, सन २०२२ मध्ये मोठ्या प्रमाणावर शासकीय शाळांचा पट वाढलेला असणे, यासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहोचून शासकीय शाळा शिक्षकांनी काम केलेले असणे, मात्र सरकारी शाळांमध्ये स्वच्छता गृहांची उपलब्धता नसणे, विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्याची सोय नसणे, ग्रंथालय तसेच संगणक यासारख्या अन्य सोयी-सुविधा नसणे, त्यामुळे राज्यातील विद्यार्थ्यांची पाऊले पुन्हा खासगी शाळांकडे वळली असून, दोन वर्षांत पहिली ते पाचवीच्या नोंदणीत पाच ते सहा टक्के तर सहावी ते आठवीच्या पट नोंदणीत सात ते आठ टक्क्यांनी घट होणे, तसेच विद्यार्थ्यांची गुणवत्ता देखील खालावलेलीच असणे, परिणामी सोयी-सुविधांअभावी राज्यातील सरकारी शाळा ओस पडू नयेत व शालेय स्तरावरील शैक्षणिक गुणवत्ता वाढवणे तसेच राज्यातील शासकीय

अस्वाक्षरित प्रत

शाळेतील पटसंख्या वाढवण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(६) **श्री.अमोल मिटकरी, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे, **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात मोठ्या प्रमाणात शहरी व ग्रामीण भागात सुरु असलेले खाजगी कोचिंग क्लासेस, शिक्षण क्षेत्रात विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी सुरु असलेले शैक्षणिक स्पर्धा यामध्ये आपल्या मुलांना उच्च दर्जाचे शिक्षण मिळावे म्हणून अनेक पालक विद्यार्थ्यांना कोचिंग क्लासेसमध्ये लाखो रुपये फी भरुन घेत असलेला प्रवेश, यामध्ये विशेषत: जीईई व नीट अशासारखे तांत्रिक व वैद्यकीय प्रवेशाकरिता विद्यार्थ्यांमध्ये असलेली स्पर्धा,याचा फायदा क्लासेस मालकांकडून घेण्यात येऊन लाखो रुपयांची फी आकारण्यात येणे, मात्र त्याची कोणत्याही प्रकारची पक्की पावती देण्यात न येणे, व या उत्पन्नाची कुठेही नोंद नसल्यामुळे शासनास यामधून मिळणारा कर देखील भरण्यात न येणे, या माध्यमातून शासनाची फसवणूक करणे खाजगी कोचिंग क्लासेस विद्यार्थ्यांना शिकविताना कोणतीही नियमावली नसणे तसेच किती शुल्क आकारावे याची मर्यादा नसणे, यामध्ये विद्यार्थ्यांची होत असलेली आर्थिक पिळवणूक, आपल्या पाल्यास चांगले शिक्षण मिळावे म्हणून गोरगरीब व शेतकऱ्यांची मुले देखील नाईलाजास्तव अशा खाजगी शिकवणीमध्ये प्रवेश घेताना त्यांना द्यावे लागणारी फी ही त्यांच्या उत्पन्नाच्या प्रमाणात जास्त असणे, अशी मुले स्पर्धेत भाग घेण्यासाठी मागे राहण्याची शक्यता लक्षात घेऊन कोचिंग क्लासेसना प्रवेश घेऊन लाखो रुपये फी भरुन कर्जबाजारी होत असणे,या खाजगी कोचिंग क्लासेसवर शासनाचे आवश्यक नियंत्रण राहण्यासाठी शासनाने मार्गदर्शक नियमावली तयार करण्याची आवश्यकता व शासनाची भूमिका."

(७) **श्री.अंबादास दानवे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे, **खनिकर्म मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"गडचिरोली जिल्ह्यातील सुरजागडमध्ये मोठ्या प्रमाणावर लोहखनिज साठे असून सन २००७ मध्ये लॉयड्स मेटल्स कंपनीला ३४८.९ हेक्टर क्षेत्रात उत्खननास परवानगी देण्यात येणे, सन २०२३ मध्ये तब्बल ४६८४ हेक्टर क्षेत्रावर सहा नवीन खाणी प्रस्तावित करणे,त्यामुळे वनहक्क कायदा (२००६) अंतर्गत सुमारे ४०,९०० आदिवासी विस्थापित होण्याची शक्यता असणे, सन

२०११ ते २०१६ या कालावधीत आदिवासींच्या सततच्या आंदोलनानंतरही उत्खनन सुरू असणे, सन २०२१ मध्ये १०,००० हून अधिक आदिवासींनी सरकारविरोधात आंदोलन केल्यानंतर त्यांचेवर पोलिस कारवाई करण्यात येणे, खनिजाची वाहतूक करणाऱ्या ट्रकमुळे झालेल्या अपघातात अनेक नागरिक अपघातग्रस्त होवूनही त्यांना कोणतीच मदत न मिळणे,खाणीतील दुषित पाणी शेतामध्ये गेल्याने शेती उत्पादनावर झालेला परिणाम, केंद्र सरकारने सन २०२३ मध्ये वार्षिक १० दशलक्ष टन लोहखनिज उत्खननास परवानगी दिलेली असणे, तसेच,मा.मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल होऊनही सरकारने अद्याप उत्तर दिलेले नसणे, सन २००६ मध्ये मिळालेली पर्यावरण मंजुरी ५ वर्षांसाठी असतानाही, २०११ ते २०२३ दरम्यान मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर उत्खनन केलेले असणे, लॉयड्स मेटल्स कंपनीला लोहखनिज मुक्त विक्रीस मोकळीक दिल्यामुळे शासनाचे १०,००० कोटींपेक्षा अधिक नुकसान झालेले असणे, सुरजागड खाणीमुळे स्थानिक आदिवासींच्या विस्थापनाचा धोका निर्माण झाला असून, पर्यावरणीय संकट अधिक तीव्र झालेले असणे, त्यामुळे उक्त प्रकरणी तात्काळ चौकशी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(८) **श्री.श्रीकांत भारतीय, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सहकार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"सह्याद्री बँकेची स्थापना हातगाडी कामगारांच्या आर्थिक गरजा भागविण्यासाठी माथाडी कामगारांमार्फत १९६० च्या दशकात करण्यात येणे, त्यांच्या आजवरच्या कार्यकाळात त्यांच्या पदाचा दुरूपयोग करून विनानिविदा कोटयवधी रूपयांच्या वस्तुंची खरेदी करणे, आरबीआय ची परवानगी न घेता बँकेची शाखा स्थलांतरीत करून एकाच शाखेसाठी दोन ठिकाणचे भाडे घेणे, स्वत:च्या मुलाच्यामार्फत कोटयवधी रूपयांच्या शासकीय रोख्यांची खरेदी-विक्री करणे, वर्ग-२ ची जमीन तारण घेवून बेकायदेशीररित्या कोटयवधी रूपयांच्या कर्जाचे वाटप करणे, गेल्या ९ वर्षांपासून बँकेच्या निवडणुका न घेणे, अशी अनेक नियमबाह्य कामे केल्याची बाब वेळोवेळी उघड होणे, त्यानुषंगाने या प्रकरणी संबंधित दोषी सभापती यांचेविरूध्द पोलीस प्रशासन तसेच अन्य शासकीय विभागांमार्फत कारवाई करण्यासाठी विविध चौकशी समित्यांची नियुक्त्या होऊन देखील आजपर्यंत संबंधित सभापती यांचेवर कोणतीच फौजदारी व कायदेशीर कारवाई करण्यात आलेली नसणे, परिणामी सद्य:स्थितीत गोरगरीबांच्या या बँकेची आर्थिक परिस्थिती ही अत्यंत डबघाईला आलेली असणे, सभापतींच्या या

बोगस कारभारामुळे NPA मर्यादेबाहेर गेल्याने आरबीआयमार्फत बँकेवर विविध निर्बंध घालण्यात आलेले असणे, तरी संबंधित दोषी सभापतींवर तातडीने फौजदारी कारवाई करून बँकेच्या ठेवीदारांच्या हिताचे रक्षण करण्याबाबत ठेवीदारांकडून होत असलेल्या मागणीच्या अनुषंगाने शासनाने तातडीने करावयाची कारवाई व शासनाची नेमकी भूमिका."

(९) **ॲड.निरंजन डावखरे,** श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, सर्वश्री ज्ञानेश्वर म्हात्रे, प्रसाद लाड, सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, श्री.विक्रांत पाटील, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"ठाणे शहराला लोकसंख्येच्या मानाने पुरेसा पाणीपुरवठा होत असल्याचा दावा महापालिकेने केला असला तरी काही भागांना टँकरवर अवलंबून राहावे लागत असल्याचे फेब्रुवारी, २०२५ मध्ये निदर्शनास येणे, वाढती लोकसंख्या, पाणीपुरवठा क्षमता लक्षात घेता, पालिकेने इतर चार स्त्रोतांद्वारे ३०० दशलक्ष वाढीव पाणी मिळविण्याच्या हालचाली सुरू केल्या असणे, ठाणेकरांना ५८५ दशलक्ष लीटर पाणीपुरवठा होणे, महापालिकेच्या स्वतःच्या पाणीपुरवठा योजनेतून २५० दशलक्ष लीटर, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून १३५ दशलक्ष लीटर, बृहन्मुंबई महापालिकेकडून ८४ दशलक्ष लीटर, स्टेम कंपनीकडून ११५ दशलक्ष लीटर इतका पाणीपुरवठा करण्यात येणे, हा पाणीपुरवठा पुरेसा असला तरी महापालिकेने पाणी मिळावे यासाठी प्रयत्न सुरू केले असणे, पाणी नियोजन आराखडा तयार असून या आराखड्यानुसार शहराला पुढील ३० वर्षात प्रतिदिन १११६ दशलक्ष लीटर पाण्याची गरज असणे, रोज ६१६ दशलक्ष लीटर पाण्याचा कोटा मंजूर असल्याने वाढीव पाण्यासाठी पालिकेने प्रयत्न सुरू केले असणे, पालिकेला चार स्त्रोतांमधून दररोज तीनशे दशलक्ष लीटर वाढीव पाणी गरजेचे असणे, यासाठी पालघर जिल्ह्यातील सूर्या, देहरने धरणांमधून प्रत्येकी शंभर दशलक्ष लीटर इतके पाणी हवे असून, त्यासाठी पालिकेने जलसंपदा विभागाकडे पाठपुरावा सुरू केला असणे, यावर शासनाने तात्काळ निर्णय घेऊन वाढीव पाणी पुरवठा करण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

असुधारित प्रत

(१०) **श्री.राजेश राठोड**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबईतील म्हाडामध्ये २३ निवृत्त अधिकाऱ्यांची ओएसडी म्हणून नियुक्ती करण्यात आल्याची माहिती माहितीच्या अधिकारातून माहे मार्च, २०२५ च्या दरम्यान निदर्शनास येणे, नियुक्त झालेल्या २३ अधिकाऱ्यांपैकी १० अधिकारी म्हाडाच्या दुरुस्ती मंडळात नियुक्त करण्यात आल्याचे उघड होणे, त्यांच्याकडे जुन्या आणि जीर्ण झालेल्या इमारतींच्या देखभालीची जबाबदारी असणे, नवे अभियंते आणि प्रशासकीय कर्मचाऱ्यांना संधी देण्याच्या गरजेच्या काळातही म्हाडाने निवृत्त अधिकाऱ्यांनाच प्राधान्य दिले असणे, निवृत्ती होऊन मुंबई इमारत दुरुस्ती व पुर्नरचना मंडळातील अधिकाऱ्याची गेल्या ४ वर्षापासून सातत्याने फेरनियुक्ती केली जात असणे, वास्तविक ओएसडींची नियुक्ती एक वर्षासाठी करणे आवश्यक असताना मात्र, राजकीय दबाव वापरून कार्यकाळ वाढवून घेण्यात येत असणे, यामुळे प्रचंड आर्थिक गैरव्यवहार होत असल्याची जनमानसांत होत असलेली चर्चा, परिणामी जनतेत पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत राज्य शासनाने तातडीने चौकशी करुन करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

(११) **श्री.योगेश टिळेकर**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"पुणे शहरातील कोंढवा, येवलेवाडी, पिसोळी या भागामध्ये मोठ्या प्रमाणात अनधिकृत प्लॉटिंग करून नागरिकांना त्याची विक्री केली जात असणे. सदरचे प्लॉटिंग करताना मोठमोठे डोंगर सपाट करून त्यातील मुरमाचे उत्खनन केले जाणे, सदरचे प्लॉटिंग हे अनधिकृत असल्याने सामान्य गरीब नागरिकांना तिची विक्री केली जात असणे, परंतु प्लॉटिंग अनधिकृत असल्याने त्या नागरिकांची मोठ्या प्रमाणात फसवणूक होणे, आयुष्याची पुंजी खर्च करून स्वतःचे घर असावे या स्वप्नापोटी गोरगरीब नागरिक अशा प्रकारचे अनधिकृत खरेदी करतो आणि त्याची मोठ्या प्रमाणात फसवणूक होणे, सदर कोंढवा येवलेवाडी पिसोळी या भागात चालू असलेले डोंगरावरील उत्खनन अनधिकृत यांची विक्री याची पाहणी करून संबंधित प्लॉटिंग करणाऱ्या मालकावर तातडीने कारवाई करावी यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी संबधित विभागाकडे वारंवार लेखी तक्रार करणे, परंतु या तक्रारी कडे दुर्लक्ष केल्यामुळे हा प्लॉटिंगचा व्यवसाय राजरोसपणे चालू असणे, त्यामुळे अधिकाऱ्यांनी कारवाई न केल्यामुळे

अग्रिम प्रत

त्यांच्यावर संशय निर्माण होणे, यासाठी सदरचे चाललेले अनधिकृत मुरूम खोदाई व प्लॉटिंग बंद करून हे करणाऱ्या व्यक्तींवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची तातडीची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

(१२) **सर्वश्री मिलिंद नार्वेकर,** सुनिल शिंदे, सत्यजीत तांबे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **वने मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"टिपेश्वर अभयारण्यातील 'पिसी' वाघिणीच्या गळ्यात तारेचा फास अडकल्याची घटना ताजी असतानाच पांढरकवडा वनविभागाच्या मुकुटबन वनपरीक्षेत्र अंतर्गत येणाऱ्या पवणार गावानजीक 'टी नाईन' नावाच्या वाघिणीच्या गळ्यात तारेचा फास अडकल्याची घटना दिनांक २५ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्या सुमारास उघडकीस आली असणे, गळ्यात फास अडकलेल्या एका वाघिणीचा शोध संपत नाही, तोच दुसरी वाघीण फासात अडकल्याने वन विभागात उडालेली खळबळ, टिपेश्वर आणि पांढरकवडा परिसरात वन्यजीवांची संख्या मोठी असणे, टिपेश्वर मधील पिसी वाघिणीच्या गळ्यात अडकलेली तार काढून तिला रेस्क्यू करून उपचार देण्यात रेस्क्यू टीमला आलेले अपयश, आता 'टी नाईन' वाघिणीसाठी देखील रेस्क्यू टीम दाखल करण्यात आली असणे, विशेष म्हणजे 'टी नाइन' वाघिणीच्या गळ्यात अडकलेला शिकारीचा फास हा 'पिसी' वाघिणीच्या शिकारीसाठी वापरलेल्या तारेसारखाच असणे, त्यामुळे ससे, हरिण, मोर या प्राण्यांच्या शिकाऱ्यांनी आता वाघाच्या शिकारीकडे मोर्चा वळविला असल्याची दाट शक्यता निर्माण झाले असणे, टिपेश्वर अभयारण्य वाघांच्या अधिवासासाठी प्रसिद्ध असून येथे हमखास व्याघ्रदर्शन होत असल्याने पर्यटकांचीही सातत्याने गर्दी असणे, वाघिणींच्या गळ्यात फास अडकल्याच्या दोन घटना उजेडात आल्याने पर्यटकांसोबतच शिकारी देखील सक्रिय झाल्याची भीती स्थानिक नागरिकांकडून व्यक्त होणे, यास्तव टिपेश्वर आणि पांढरकवडा परिसरातील वाघांच्या सुरक्षिततेसाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(१३) **सर्वश्री विक्रम काळे,** अशोक ऊर्फ भाई जगताप, अभिजित वंजारी, राजेश राठोड, सतेज ऊर्फ बंटी पाटील, सुधाकर अडबाले, धीरज लिंगाडे, जयंत आसगावकर, डॉ.प्रज्ञा सातव, सर्वश्री किरण सरनाईक, ज्ञानेश्वर म्हात्रे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे**

अस्वाक्षरित प्रत

लक्ष वेधतील :-

"राज्यामध्ये दि. १ नोव्हेंबर, २००५ नंतर सेवेत आलेल्या शिक्षक तसेच सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांना नवीन अंशदायी पेन्शन योजना (DCPS) लागू करण्यात येणे, परंतु दि. १ नोव्हेंबर, २००५ पुर्वी सेवेत आलेल्यांसाठी सन १९८२ ची जुनी पेन्शन योजना लागू असणे, शालेय शिक्षण विभागांतर्गत दि. १ नोव्हेंबर, २००५ पुर्वी सेवेत आलेले परंतु त्यांची शाळा तदनंतर १००% अनुदानावर आलेल्या असणे, त्यामुळे त्यांची जुन्या पेन्शन योजनेची जी.पी.एफ खाती आजरोजी सुरु असणे, परंतु त्यांच्या वेतनातून कपात होणारी जी.पी.एफ ची वजावट बंद करणे, ६ व्या व ७ व्या वेतन आयोगाचे हप्ते त्यांच्या खात्यावर जमा न होणे, त्यांची नियुक्ती दि. १ नोव्हेंबर, २००५ पुर्वीची असणे, म्हणून त्यांना नियमानुसार सन १९८२ ची जुनी पेन्शन योजना लागु करणे गरजेचे असणे, वारंवार मागणी व आंदोलने होणे, शासनाने आतापर्यंत यासाठी विविध ३ समित्यांचे गठन करणे, तत्कालीन सरकारने दि. १ नोव्हेंबर, २००५ पुर्वी ज्यांची पदभरतीची जाहिरात होती, व नियुक्ती तद्नंतर केलेली असणे, त्या सर्वांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याचा निर्णय घेणे, परंतु या सर्व शिक्षक-कर्मचाऱ्यांना जुन्या पेन्शनपासून वंचित ठेवणे, त्यामुळे दि. १ नोव्हेंबर, २००५ पुर्वी सेवेत आलेल्या व त्यानंतर १००% अनुदान मिळालेल्या सर्व शिक्षक-कर्मचाऱ्यांना सन १९८२ ची जुनी पेन्शन योजना लागू करणे, याबाबत शासनाने प्रतिक्रया व शासनाची उपाययोजना."

**(१४)** **श्री.कृपाल तुमाने,** डॉ.मनिषा कायंदे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"अन्न व नागरी पुरवठा विभागाने राज्यातील विविध विभागात डॅनेज पॅलेट पुरवठा करणेकरीता खाजगी पुरवठादाराची नेमणूक केलेली असणे, डॅनेज पॅलेटचा पुरवठा कंत्राट देताना कंत्राटदाराने दिलेले दर निविदेतील दरापेक्षा कमी असणे, त्यामुळे डॅनेज पॅलेटचा दर्जा कमी असल्याचे नुकतेच निदर्शनास आलेले असणे, डॅनेज पॅलेटचे कंत्राट मिळविण्याकरीता पुरवठादार कंत्राटदाराने अन्य कंत्राटदार किंवा कंपनीसोबत ज्वॉईंट व्हेंचर (जे.व्ही.) करणे, ज्वॉईंट व्हेंचर करताना नियमानुसार कार्यवाही करण्यात न येणे, त्यामुळे या सर्व प्रकरणात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे उघडकीस येणे, सदर प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी तत्कालीन मुख्यमंत्री महोदयांकडे माहे

अग्रिम प्रत

ऑगस्ट, २०२४ मध्ये लेखी निवेदनाद्वारा केलेली असणे, त्यानुषंगाने तत्कालीन मुख्यमंत्री महोदयांनी सचिव, अन्न व नागरी पुरवठा विभाग यांना उक्त प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेशीत करणे, तथापी अद्यापपर्यंत उक्त प्रकरणी कोणतीच चौकशी वा कार्यवाही झालेली नसणे, शासनाने उक्त प्रकरणी तातडीने पारदर्शक चौकशी करुन निकृष्ट दर्जाचे डॅनेज पॅलेट पुरवठा करणाऱ्यांवर तसेच त्यांना पाठिशी घालणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(१५) **श्री.सुधाकर अडबाले**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **आदिवासी विकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"आदिवासी विकास विभागाअंतर्गत अनुदानित आश्रमशाळेतील ११५५ शिक्षकांना मानधन/वेतनाची थकबाकी अदा करण्याबाबत आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांनी दि. २२.११.२०१८ च्या पत्रानुसार निर्देश दिले असणे, प्रलंबित थकीत वेतन अदा करण्याबाबत निर्देश असतानाही अजूनही कुठलीही कार्यवाही न होणे, त्यामुळे शिक्षकांत तीव्र असंतोष असणे, सदर नियुक्ती दिनांकापासून विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात आलेल्या ११५५ शिक्षकांना मानधन/वेतनाची थकबाकी तात्काळ अदा करणे याबाबत शासनाने करावयाची आवश्यक कार्यवाही तसेच याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

(१६) **श्री.अरुण लाड**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **कृषी मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"केंद्र व राज्य शासनाकडून पंतप्रधान कृषी सिंचन योजनेंतर्गत सांगली जिल्ह्यातील ७ हजार १७० शेतकऱ्यांचे सन २०२३-२४ मधील ठिबक सिंचनचे तब्बल १८ कोटींहून अधिक रकमेचे अनुदान रखडलेले असणे, जिल्ह्यातील एकूण ७ हजार १७० शेतकरी ठिबक सिंचन अनुदानासाठी पात्र ठरलेले असणे, परंतु २०२३-२४ मध्ये केवळ ७१५ शेतकऱ्यांनाच अनुदान मिळालेले असणे, उर्वरित सर्व पात्र लाभार्थी शेतकरी हे गेल्या वर्षभरापासून अनुदानाअभावी वंचित असणे, सरकारकडून शेतकऱ्यांसाठी करण्यात आलेल्या विविध योजनांच्या अंमलबजावणीत येणारे अडथळे, "महाडीबीटी" च्या माध्यमातून लाभार्थी शेतकऱ्यांना अनुदान वितरित करण्यात होत असलेला विलंब, शासकीय अनुदान मिळेल या आशेवर शेतकऱ्यांनी लाखो रूपयांचे कर्ज काढून उसनवारीवर महागड्या कंपन्यांचे ठिबक सिंचन बसविलेले असणे, शासनाकडून अनुदान

अग्रिम प्रत

वाटपात होत असलेला विलंब व सांगली जिल्हा कृषी विभागाकडून याबाबत कोणतेही प्रयत्न होत नसल्यामुळे शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडलेला असणे, शासनाकडून होत असलेल्या दुर्लक्षामुळे असंख्य शेतकऱ्यांवर कर्जबाजारी होण्याची वेळ आलेली असणे, शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी तात्काळ अनुदान वितरित करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(१७) **श्री.विक्रांत पाटील**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **कामगार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाने सन  २०१९ मध्ये ओपन भरती प्रक्रिया राबवून ३ हजार सुरक्षा रक्षकांची नोंदणी करणे, मात्र गेल्या ५ वर्षापासून २५०० सुरक्षा रक्षक प्रतिक्षा यादीवर असूनही त्यांना रायगड सुरक्षा मंडळातील अधिकारी यांनी जाणीवपूर्वक आस्थापणेवर  नियुक्ती न देणे, सुरक्षा रक्षक पदाची आस्थापनाकडून मागणी नसल्यामुळे नियुक्ती करण्यात येऊ शकत नाही अशी माहिती मंडळाच्या अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत सुरक्षा रक्षकांना सातत्याने देण्यात  येणे, नोंदीत प्रतिनिधींना क्रमशः नोकरी देणे अपेक्षित असताना वास्तवात तसे होत नसणे, परिणामी प्रतिक्षा यादीत असलेल्या सुरक्षा रक्षकांमध्ये मोठ्या प्रमाणात असंतोषाचे वातावरण पसरलेले असणे, महाराष्ट्र शासनाने स्थापन केलेल्या रायगड सुरक्षा रक्षक मंडळात प्रतिक्षा यादीतील सुरक्षा रक्षकांची आस्थापनेवर प्राधान्याने नियुक्त करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी दि.१५/१/२०२५ रोजी मा.कामगार मंत्री यांना निवेदन दिलेले असणे, शासनाने रायगड जिल्हा सुरक्षा मंडळातील प्रतिक्षा यादीतील जिल्हा सुरक्षा रक्षकांची आस्थापनांमध्ये तातडीने नियुक्ती करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया,"

(१८) **सर्वश्री प्रसाद लाड,** विक्रांत पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, सर्वश्री ज्ञानेश्वर म्हात्रे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"शासकीय रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे असून रुग्णालयांमध्ये चांगल्या दर्जाची व नामांकित कंपन्यांची औषधे पुरविण्यात यावीत व वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणाच्या

अग्रिम प्रत

पुरवठा करण्यात येणाऱ्या औषधांच्या नमुन्यांच्या तपासणीत दोषी आढळल्यास संबंधितांवर थेट कारवाई करा त्याचबरोबर रुग्णांचा डायलिसीस, सिटी स्कॅन, एमआरआय व रक्त चाचण्यांचा अहवाल येण्यास उशीर का होतो याची तपासणी करण्यासाठी समिती स्थापन करून समितीच्या तपासणीत दोषी आढळल्यास संबंधितांवर कारवाई करा असे आदेश सार्वजनिक आरोग्य कुटुंब कल्याण मंत्री महोदयांनी दिल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात समोर येणे, सदर आदेशाची अंमबजावणी करून रुग्णांना तातडीने सुविधा देण्याची आवश्यकता व करावयाची कार्यवाही."

**सहा : म.वि.प. नियम १०१ — अ अन्वये विशेष उल्लेख — (असल्यास)**

## - मध्यंतर -

**सात : म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा —**
**(गुरुवार, दिनांक २० मार्च, २०२५ रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा)**
**[अनुक्रमांक (१)] —**

(१) **सर्वश्री अमोल मिटकरी,** शिवाजीराव गर्जे, विक्रम काळे, **वि.प.स यांची म.वि.प.** नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा —

"महाराष्ट्राच्या भूमीला संतांची, महापुरुषांची मोठी परंपरा असून त्यांची शिकवण, संस्कार महाराष्ट्राच्या भुमीमध्ये खोलवर रुजलेली असणे, त्यामुळे महाराष्ट्राची एक वेगळी ओळख निर्माण झालेली असणे, मात्र समाजातील काही समाजद्रोही लोकांकडून या महापुरुषांच्या गौरवशाली, प्रेरणादायी आणि महाराष्ट्राला मार्गदर्शक असणाऱ्या इतिहासाला डाग लावण्याचा प्रकार होत असून नुकतेच माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये महापुरुषांबाबत आक्षेपार्ह वक्तव्य करण्यात येणे, थोर इतिहास संशोधक, तज्ञ यांनी संशोधनातून सिध्द केलेल्या इतिहासाला वेगवेगळ्या सोशल मिडियामधून आक्षेपार्ह विधानातून महापुरुषांचे चरित्र हनन करण्याचा प्रयत्न होत असणे, व त्यांच्याबाबत वेगवेगळ्या समाज माध्यमांमध्ये आक्षेपार्ह लिखाण करण्यात येणे, छत्रपती संभाजी महाराजांचा इतिहास अभ्यासता यावा यासाठी सरकारने इतिहास संशोधकांच्या अध्यक्षतेखाली चरित्र साधन समिती गठीत करावी, संभाजी महाराजांचा दैदिप्यमान इतिहास मराठी पाठ्यपुस्तकांसह इंग्रजी

अप्रकाशित प्रत

सी.बी.एस.सी अभ्यासक्रमात अंतर्भूत करण्यात यावा त्याचप्रमाणे विकिपीडिया, शासकीय मुद्रणालयामध्ये उपलब्ध साहित्य, गुगल, युट्यूब, सिनेमा या ठिकाणी उपलब्ध असलेल्या कपोलकल्पित माहितीवर कायमस्वरुपी बंदी घालण्यात यावी, यासाठी स्वतंत्र कायदा करुन त्यांची विटंबना होणार नाही, असे होणे अत्यंत गरजेचे आहे, यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(२)** **ॲड.निरंजन डावखरे,** सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, **वि.प.स यांची म.वि.प.** नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –

"ठाणे जिल्ह्यातील भाईंदर (प) मधील उत्तन चौकात शरीफ हजरत सय्यद बालेशहा पीर नावाचे अनधिकृत धार्मिकस्थळ असणे, सदर अनधिकृत धार्मिकस्थळ राष्ट्रीय सुरक्षिततेच्यादृष्टीने अतिशय धोकादायक असणे, सन २०११ मध्ये तत्कालीन अपर पोलीस अधीक्षक, वसई यांनी तत्कालीन जिल्हाधिकारी, ठाणे यांना लेखी स्वरुपात सदर अनधिकृत धार्मिकस्थळ निर्माण होत असल्याबाबत कळविणे, सदर प्रकरणी महसूल विभागाने कोणतीही कारवाई केली नसल्याने सदर अनधिकृत धार्मिकस्थळाजवळ अवैध घडामोडी घडत असणे, अनधिकृत धार्मिकस्थळ वेळेवर निष्कासित न केल्यामुळे अशाच प्रकारच्या शासकीय जमिनी अनधिकृतपणे बळकाविण्याचा प्रयत्न इतर ठिकाणी होत असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(३)** **सर्वश्री इद्रिस नायकवडी,** विक्रम काळे, अमोल मिटकरी, **वि.प.स यांची म.वि.प.** नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –

"राज्यातील प्राथमिक,माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिपायांची पदे व्यपगत करण्यात आली असून त्याऐवजी शिपाई भत्ता त्यांना अनुज्ञेय करण्यात आलेला असणे, तथापि, शिपाई भत्ता अत्यंत अपुरा असून त्याऐवजी कर्मचारी उपलब्ध होत नसणे, तसेच तात्पुरत्या स्वरुपातील कर्मचारी हा शासनाची जबाबदारी स्वीकारीत नसणे, त्यामुळे अशा कर्मचाऱ्यांना जबाबदार धरता येणे शक्य नसणे, राज्यातील शाळांमधील संरक्षणाचा प्रश्न अत्यंत गंभीर असणे, त्यामुळे शिपायांची पदे नियमित करण्याबाबत कारवाई करणे, तसेच बदलापूरसारख्या (जि.ठाणे) घटना घडल्यामुळे शालेय विद्यार्थ्यांच्या संरक्षणांबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**आठ : शासकीय विधेयके –**

**(क) विधानसभेने संमत केल्यास – विधेयक विचारात घेणे :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक २८ - महाराष्ट्र विनियोजन विधेयक, २०२५"

---

**(ख) विचार, खंडश: विचार व संमत करणे:-**

"सन २०२५ चे वि.प.वि. क्रमांक ४- महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) (सुधारणा) विधेयक, २०२५"

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. एकनाथराव खडसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

(१) "सन २०२५ चे वि.प.वि. क्रमांक ४- महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) (सुधारणा) विधेयक, २०२५" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ६५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, शशिकांत शिंदे, सचिन अहिर, अभिजीत वंजारी, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

(२) "सन २०२५ चे वि.प.वि. क्रमांक ४- महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) (सुधारणा) विधेयक, २०२५" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(ग) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे – विधेयक विचारात घेणे :-**

(१) "सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक २३ – महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) विधेयक २०२५"

(२) "सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक २४ – महाराष्ट्र मोटार वाहन कर (सुधारणा) विधेयक २०२५"

---

अग्रिम प्रत

**(घ) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे — विचार, खंडश: विचार व संमत करणे:-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक २५ — महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (सुधारणा) विधेयक २०२५"

---

**(च) विधानसभेने संमत केल्यास — विचार, खंडश: विचार व संमत करणे:-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७ — महाराष्ट्र महामार्ग (सुधारणा) विधेयक २०२५"

---

**नऊ : पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री यांचा म.वि.प. नियम १०६ अन्वये शासकीय ठराव :-**

ज्याअर्थी, महाराष्ट्र विधानसभेने व महाराष्ट्र विधानपरिषदेने, १ जून, १९८१ रोजी, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २५२ च्या खंड (१) च्या अनुसार ठराव केला होता आणि संसदेने पारित केल्याप्रमाणे, जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९७४ (१९७४ चा ६) आणि जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) (सुधारणा) अधिनियम, १९७८ (१९७८ चा ४४) अंगीकृत केले होते ;

आणि ज्याअर्थी, संसदेने, जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९७४ यात, जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) (सुधारणा) अधिनियम, २०२४ (२०२४ चा ५) याद्वारे सुधारणा केली आहे ;

आणि ज्याअर्थी, जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) (सुधारणा) अधिनियम, २०२४ याच्या कलम १ च्या पोट-कलम (२) मध्ये अशी तरतूद केली आहे की, जे राज्य, संविधानाच्या अनुच्छेद २५२ च्या खंड (१) तसेच त्याच्या खंड (२) अन्वये याबाबतीत पारित केलेल्या ठरावाद्वारे, २०२४ चा उक्त सुधारणा अधिनियम अंगीकृत करील अशा अन्य राज्यास, हा अधिनियम लागू असेल ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाचे असे मत आहे की, जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) (सुधारणा) अधिनियम, २०२४ महाराष्ट्र राज्यात अंगीकृत करण्यात यावा ;

त्याअर्थी, आता, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २५२ च्या खंड (२) अनुसार, महाराष्ट्र विधानपरिषद, याद्वारे, असा ठराव करते की, संसदेने पारित केलेला, जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) (सुधारणा) अधिनियम, २०२४ (२०२४ चा ५) महाराष्ट्र राज्यासाठी अंगीकृत करण्यात यावा.

**दहा : (गुरुवार, दिनांक २० मार्च, २०२५ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात**

**दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव) -**

**सर्वश्री अंबादास दानवे,** सतेज ऊर्फ बंटी पाटील, एकनाथराव खडसे, ॲड.अनिल परब, सर्वश्री अभिजीत वंजारी, शशिकांत शिंदे, सचिन अहिर, अशोक ऊर्फ भाई जगताप, सुनिल शिंदे, जयंत आसगावकर, जगन्नाथ अभ्यंकर, डॉ.प्रज्ञा सातव, सर्वश्री धीरज लिंगाडे, राजेश राठोड, सुधाकर अडबाले, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव —**

"राज्यात कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती अत्यंत गंभीर बनली असून शासनाच्या निष्क्रियतेमुळे गुन्हेगारीला चालना मिळत असणे, महिलांवरील अत्याचार, सायबर गुन्हे, आर्थिक गुन्हे, गँगवॉर, जबरी चोरी, खंडणी, गोळीबाराच्या घटनांमध्ये झालेली वाढ, सण-उत्सवांमध्ये वाढलेल्या तणावाच्या घटना, जातीय व धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्यांवर कारवाई होत नसल्यामुळे राज्यातील सामाजिक सौहार्द धोक्यात आले असणे, राज्यात ड्रग माफिया, वाळू माफिया, भू-माफिया, अवैधपणे दारु विक्री करणारे आणि बोगस कंपन्यांमार्फत आर्थिक घोटाळे करणाऱ्या टोळ्यांना अभय मिळणे, बीड मधील मस्साजोगच्या सरपंचाची निर्घृण हत्या, परभणीत संविधान अवमान प्रकरणावरुन दोन गटांत दंगल, पोलीस कोठडीत एकाचा मृत्यू, बदलापूर येथे चिमुकलीवर शाळेतच शिपायाकडून झालेला अत्याचार, आरोपीचा पोलिसांकडून करण्यात आलेला एन्काऊंटर, पुणे येथील स्वारगेट एसटी आगारात तरुणीवर झालेला बलात्कार, पुण्यात दिवसाढवळ्या कोयता गँगची दहशत, विशाळगड परिसरातील अतिक्रमण हटविण्यासाठी काढलेल्या मोर्चास लागलेल्या हिंसक वळणामुळे झालेले नुकसान, त्यातच लोकप्रतिनिधींचे त्यांच्या कार्यकर्त्यांना गुन्हेगारी करण्यास मिळत असलेले अभय, औरंगजेबाचा कबरीचा वाद निर्माण करुन नागपूर व इतर ठिकाणी दंगल घडवून समाजात तेढ निर्माण करणे, विविध खात्यातील अनियमितता व अनागोंदी कारभार, त्यामुळे अनेक निविदा रद्द करण्याचा घेतलेला निर्णयामुळे शासनाच्या कारभारावर निर्माण झालेले प्रश्नचिन्ह, यामध्ये वैद्यकीय शिक्षण विभागामध्ये विविध महाविद्यालयांना दिलेली मंजुरी, परिचारकांच्या महाविद्यालयास देताना त्यासाठी नियुक्त केलेल्या समितीने सूचविलेल्या महाविद्यालयांव्यतिरिक्त ४०० ते ५०० महाविद्यालयांना त्यासाठी असलेले नियम व निकष डावलून त्रुटी असलेल्या महाविद्यालयांना नियमबाह्यरित्या मंजूरी देवून केलेला भ्रष्टाचार, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

अप्रकाशित प्रत

**अकरा : (मंगळवार, दिनांक १८ मार्च, २०२५, बुधवार, १९ मार्च, २०२५ व गुरुवार, दिनांक**

**२० मार्च, २०२५ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) - (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर) –**

**सर्वश्री प्रविण दरेकर,** हेमंत पाटील, डॉ.मनिषा कायंदे, सर्वश्री प्रसाद लाड, विक्रम काळे, सतिश चव्हाण, श्रीमती चित्रा वाघ, श्रीमती भावना गवळी, सर्वश्री कृपाल तुमाने, श्रीकांत भारतीय, अमोल मिटकरी, किशोर दराडे, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री किरण सरनाईक, पंकज भुजबळ, राजहंस सिंह, शिवाजीराव गर्जे, योगेश टिळेकर, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री ज्ञानेश्वर म्हात्रे, विक्रांत पाटील, सदाशिव खोत, अमित गोरखे, वसंत खंडेलवाल, डॉ.परिणय फुके, सर्वश्री अमरीशभाई पटेल, धर्मगुरु बाबुसिंग राठोड, रणजितसिंह मोहिते-पाटील, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव –**

"नागपूर कराराचे उद्दीष्ट डोळ्यासमोर ठेऊन नागपूरसह विदर्भाच्या विकासाला चालना देण्याकरिता विद्यमान शासन कटीबध्द असणे, नागपूर जवळील मिहानमध्ये सेझअंतर्गत पायाभूत सुविधा निर्माण झाल्याने बोईंगच्या एमआरओसह अनेक उद्योगांनी नागपूरात येण्यास स्वारस्य दाखविल्याचे निदर्शनास येणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय नागपूर विमानतळाचे अद्ययावतीकरण आणि विस्तारीकरण हा नागपूरच्या विकासाचा मैलाचा दगड ठरणार असणे, विस्तारित विमानतळाच्या माध्यमातून ९,००,००० टन क्षमतेच्या कार्गोची हाताळणी होणार असणे, परिणामी, नागपूर विमानतळ मध्य भारतातील गेम चेंजर म्हणून सिध्द होणार असणे, नवीन विमानतळ ३,००,००० स्क्वे. फूट क्षेत्रात बांधले जाणार असल्याने व सध्याच्या धावपट्टीच्या शेजारी आणखी ६० मीटर रुंद आणि ४ हजार मीटर लांबीची धावपट्टी बांधण्यात येणार असल्याने तेथे एकाच वेळी १०० विमाने उभी राहण्याचे प्रयोजन असणे, मोठ्या औद्योगिक टाऊनशीपला लागून असलेले कार्गो हब आणि मोठे विमानतळ ही रचना विदर्भातील भविष्याच्या विकासाचे द्योतक ठरणार असणे, विमानतळाच्या विस्तारामुळे येथून होणाऱ्या माल वाहतुकीची क्षमता वाढल्याने विदर्भातील सर्व उत्पादनांची निर्यात होण्यास गती मिळणार असणे व त्यामुळे सुमारे १ लाख लोकांना रोजगार उपलब्ध होणार असणे, रस्ते, रेल्वे, विमानतळ विकास यामुळे विदर्भ लॉजिस्टीक हब म्हणून विकसित होणार असणे, माहे जानेवारी, २०२५ मध्ये दावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेमध्ये, ६३ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यांशी सुमारे १५ लाख ७२ हजार कोटी रुपये इतक्या गुंतवणूकीच्या सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या झाल्याने महाराष्ट्र हे थेट परकीय गुंतवणूकीसाठी पसंतीचे राज्य असल्याचे स्पष्ट झाले असणे, देशातील एकूण थेट परकीय गुंतवणूकीच्या २९टक्के गुंतवणूक राज्यात आली असणे, परिणामी, राज्यात १५ लाखांपेक्षा अधिक रोजगाराच्या संधी उपलब्ध होणे, राज्य शासन आणि बजाज फिनसर्व्ह यांच्यात सुमारे ५ हजार कोटी रुपये गुंतवणूकीचा सामंजस्य करार करण्यात आल्याने ४० हजार रोजगारांची निर्मिती होणे अपेक्षित असणे, मुंबई महानगर

अग्रिम प्रत

विकास प्राधिकरणातील विकास केंद्राबाबत कैलिफोर्नियातील बर्कले युनिव्हर्सिटी समवेत सामंजस्य करार करण्यात येणे, सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांच्याबाबतीत महाराष्ट्र हे देशातील अग्रगण्य राज्य ठरले असणे, राज्यात मुंबई, पुणे व छत्रपती संभाजीनगर येथे जी-२० च्या विविध बैठका यशस्वीरित्या आयोजित करण्यात आल्या असणे, औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी आणि रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी राज्यातील विविध उद्योगांना सुमारे ६ हजार कोटी रुपये इतके गुंतवणूक प्रोत्साहन अनुदान वितरित करण्यात येणार असणे, राज्यातील औद्योगिकीकरणाला पाठबळ व प्रोत्साहन देण्यासाठी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत सुमारे ३,५०० एकर इतके औद्योगिक भूखंड वितरित करण्याचा निर्णय घेण्यात येणे, पुरवठा साखळीची कार्यक्षमता सुधारण्यासाठी आणि जागतिक दर्जाची व्यवसाय परिसंस्था निर्माण करण्यासाठी १० एकात्मिक औद्योगिक केंद्रे व एकात्मिक माल वाहतूक केंद्रे विकसित करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला असणे, सन २०२४-२०२५ या वर्षामध्ये, बेरोजगार युवकांना उद्योगांशी जोडण्यासाठी व रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्यासाठी राज्यात जिल्हा स्तरावर ६११ 'पंडीत दीनदयाल रोजगार मेळावे' आयोजित केले असणे, त्यायोगे १९ हजारांपेक्षा अधिक उमेदवारांना नोकऱ्या प्राप्त झाल्याचे निदर्शनास येणे, राज्यातील जनतेचे आरोग्य सदृढ ठेऊन प्रत्येक नागरिकाला 'आरोग्यम् सुखसंपदा' उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने 'महात्मा जोतीराव फुले जनआरोग्य योजना' व 'आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजना' या एकत्रित योजनेंतर्गत लाखो रुग्णांवर शस्त्रक्रिया मोफत करण्यात आल्या असणे, राज्यात ३० वर्षांवरील सर्व महिलांचे कर्करोग, मधुमेह, उच्च रक्तदाब, मोतीबिंदू, कान, नाक, घसा व इतर आजारांचे निदान व उपचार याकरिता राज्य शासनातर्फे प्रति जिल्हा २ कोटी रुपयांचा निधी देण्यात आला असणे, राज्यात शुन्य ते अठरा वर्षांपर्यंतची बालके तसेच किशोरवयीन मुलां-मुलींच्या सर्वांगीण आरोग्य तपासणीसाठी 'जागरुक पालक, सदृढ बालक' हे अभियान राज्यभर राबविण्यात येणे, राज्यात ग्रामीण तसेच दुर्गम भागांमध्ये राहणाऱ्या नागरिकांना प्रत्येक छोट्या आजारासाठी हॉस्पीटलमध्ये जाऊ लागू नये याकरिता 'हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' या योजनेंतर्गत महाराष्ट्रात ७०० दवाखाने सुरु करण्यात येणे, राज्यात विविध महापालिका व जिल्हा परिषदेतील औषधे, वैद्यकीय उपकरणे खरेदीतील अनियमिततेला पायबंद घालण्यासाठी "महाराष्ट्र वैद्यकीय खरेदी प्राधिकरण" स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात येणे, राज्यातील रस्ते, बंदरे, विमानतळ, रेल्वे, मेट्रो, वीज इ. पायाभुत सुविधा विकास क्षेत्रांसाठी निधी उभारणे आणि प्रकल्प राबविण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियंत्रणाखाली 'महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ' स्थापन करण्यात येणे, सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्वावरील कामे या महामंडळामार्फत करण्याचे प्रयोजन असणे, या योजनेंतर्गत सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत नागपूर

येथील महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटीची इमारत, नागपूर जिल्हा न्यायालयाची विस्तारित इमारत, मुंबईतील माझगाव न्यायालयाची इमारत, राज्य उत्पादन शुल्क कार्यालयाची इमारत, जलभूषण बंगला, राजभवन इ. इमारतींचे बांधकाम अलीकडेच पूर्ण करण्यात येणे, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सर्व योजनांचे संनियंत्रण करण्यासाठी प्रोजेक्ट मॅनेजमेंट इन्फॉर्मेशन सिस्टीम (PMIS) ही संगणकीय प्रणाली विकसित करण्यात येणे, भिवंडी-कल्याण-शिळफाटा रस्त्याचे सहापदरी रुंदीकरण करण्यासाठी ५६१.८५ कोटी रुपयांच्या प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्यात येणे, नाबार्ड-२८ अंतर्गत १,०३०.५२ कोटी रुपयांच्या ३८२ कामांना नाबार्ड करून मंजुरी प्राप्त झाली असणे व राज्य शासनाने देखील त्यास प्रशासकीय मान्यता दिली असणे, सर्व समाज घटकांना सोबत घेऊन, सर्वसमावेशक, प्रगतीशील, पुरोगामी व विकसित महाराष्ट्र घडविण्यासाठी आणि महाराष्ट्राला अधिकाधिक समृध्दीकडे नेण्यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## — अशासकीय कामकाज —
## (बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास)

**बारा : अशासकीय विधेयके :-**

**(क) पुर:स्थापनार्थ -**

(१) सन २०२५ चे वि.प.वि. क्रमांक १ - महाराष्ट्र राज्यातील कर्मचाऱ्यांची त्यांच्या मातापित्यांप्रती जबाबदारी, उत्तरदायित्व तसेच देखभाल यासंदर्भातील मानकांबाबत तरतूद करण्यासाठी विधेयक, २०२५ - श्री. अंबादास दानवे, वि.प.स. यांचे

(२) सन २०२५ चे वि.प.वि. क्रमांक २ - महाराष्ट्र राज्यात दुय्यम पशुवैद्यकीय परिषद स्थापन करण्याबाबत तरतूद करण्यासाठी विधेयक,२०२५ - डॉ. मनिषा कायंदे, वि.प.स. यांचे

(३) सन २०२५ चे वि.प.वि. क्रमांक ५ - महाराष्ट्र राज्यात मराठी व्यक्तींना घरे आरक्षित ठेवण्यासाठी विधेयक २०२५ - ॲड. अनिल परब, वि.प.स. यांचे

---

**(ख) विचारार्थ -**

(१) सन २०२३ चे वि.प.वि. क्रमांक ६ - महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) विधेयक, २०२३ - श्री.अंबादास दानवे, वि.प.स. यांचे

(२) सन २०२३ चे वि.प.वि. क्रमांक १ - महाराष्ट्र राज्यात लैंगिक गुन्ह्यांना प्रवृत्त करणाऱ्या जाहिराती, जाहिरात-फलक लावण्यास, समाज माध्यमांवर व संकेतस्थळांवर प्रसिध्द करण्यास प्रतिबंध करण्याबाबत विधेयक, २०२३ - श्री.अंबादास दानवे, वि.प.स. यांचे

(३) सन २०२३ चे वि.प.वि. क्रमांक ४ - महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०२३ - श्री.अंबादास दानवे, वि.प.स. यांचे

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २० मार्च, २०२५.

**जितेंद्र भोळे**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानपरिषद

असुधारित प्रत